रविवार
०८
नोव्हेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २७२
पाने - ०६
किंमत - ४ रूपये

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : डॉ. सुदीप किसन हासे

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

बेकरी व्यवसायातील मराठी नाव

शुद्धता चव आणि विश्वास... हिच आमची ओळख !

Bakery Cakery
The Taste of Love

बेकरी केकरी

चव अशी की, परत परत यावंस वाटतं...

आमच्याकडे मिळणारे पदार्थ

- गव्हाचे बिस्किट्स
- नागलीचे बिस्किट्स
- ज्वारीचे बिस्किट्स
- गावठी तुपातील बिस्किट्स
- रोट
- नानकटाई

सर्व फ्लेवर्सचे आईस केक्स व कस्टमाईज्ड केक्स खात्राशीर बनवून मिळेल

आमच्याकडे सर्व प्रकारचे बिस्किदस, रोट ऑर्डरनुसार बनवून मिळतील.

आमच्या असंख्य ग्राहकांना हितचिंत्तकांना
दीपावली व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा !

आमच्याकडे लाकडी भट्टीचे पाव हॉटेल व्यावसायिकांना व रिटेल ग्राहकांना योग्य दरात मिळेल.

आमचा पत्ता -
बेकरी केकरी
मयूर ऑटो वर्ल्ड जवळ, गुंजाळ पाटील फॅमिली गार्डन रेस्टॉरंट शेजारी, मेडिकव्हर हॉस्पिटल ते गुंजाळवाडी रोड, संगमनेर

9699393914

Follow Us

आधार फाउंडेशनने वंचितांच्या झोपड्यांमध्ये पेटविली आनंदाची पणती



संगमनेर (प्रतिनिधी) दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या वाट्याला यावा, समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्याही जीवनात आनंदाचे क्षण फुलावेत, या सामाजिक बांधिलकीतून आधार फाउंडेशन, संगमनेर यांच्या वतीने धनत्रयोदशीच्या दिवशी अनोखा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी आधार फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी विविध वस्त्यांवरील झोपड्यांमध्ये जाऊन पालावरील आणि वंचित कुटुंबांसोबत दिवाळी साजरी केली.

'चला साजरी करू या... आधारची सामाजिक दिवाळी!' आणि 'अंधार कोपऱ्यात छोटी आशेची पणती लावू या...' या प्रेरणादायी संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या कुटुंबांच्या दारात जाऊन त्यांच्यासोबत सणाचा आनंद वाटून घेणे, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि आपलेपणाची भावना निर्माण करणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. या उपक्रमांतर्गत संगमनेर येथून पोखरी हवेली, निळवंडे वस्ती, तळेगाव कारखान्यासमोरील वस्ती, बढे वस्ती रोड, सोनुशी रामटेकडी, भंडारी शेडजवळील वस्ती तसेच पारेगाव बुद्रुक येथील फॉरेस्ट वस्ती अशा विविध ठिकाणी आधारचे कार्यकर्ते पोहोचले. या माध्यमातून सुमारे २०० वंचित कुटुंबियांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सामान्यतः दिवाळीच्या सणाला प्रत्येकजण आपल्या कुटुंबासोबत आनंद साजरा करतो; मात्र समाजातील वंचित घटकांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेण्याचा आधार फाउंडेशनचा हा उपक्रम माणुसकीचे दर्शन घडविणारा ठरला. दिवाळी म्हणजे केवळ घराघरांत दिवे लावणे नव्हे, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करणे होय. धनत्रयोदशीच्या शुभदिनी आधार फाउंडेशनने कृतीतून हाच संदेश दिला. अंधारलेल्या झोपड्यांमध्ये आशेची पणती पेटविणारा आणि माणुसकीच्या नात्याला उजाळा देणारा हा सामाजिक दिवाळीचा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमासाठी आधार फाउंडेशनचे समन्वयक विठ्ठल कडूसकर पी. डी.सोनवणे डॉ. महादेव अरगडे,सुखदेव इल्हे, सोमनाथ मदने,अनिल कडलग,लक्ष्मण कोते,विनोद राऊत, प्रकल्प प्रमुख देविदास गोरे,आधारचे शिलेदार पी. आर.शिंदे,बाळासाहेब आहेर, भाऊसाहेब वैद्य, डी. टी. गुंजाळ, डॉ. नारायण जाधव,सुभाष पाराशर,संतोष शेळके,शिवाजी नरवडे,निळवंडे येथील प्रथितयश युवा उद्योजक, सेफ्टी सारथी प्रा. लि. पुण्याचे संस्थापक अध्यक्ष सागर कुलकर्णी व व्यवस्थापकीय संचालिका मानसी कुलकर्णी, प्रतिभा गडाख,यश यादव, मनोहर यादव, सुदाम खैरे, सोमनाथ थिटमे, बाबासाहेब गवांदे, महेश उदमले, सचिन आगळे, नामदेव पिंगळे, अशोक जगताप, हनुमंत गायकवाड, शाम दिघे, विजय दिघे, अरुण लामखडे,निळवंडे येथील प्रगतशील शेतकरी प्रकाश पवार, सामाजिक कार्यकर्ते शंकर पवार, उत्तमराव देशमुख, दत्तात्रय शेणकर, ऋषिकेश शिंदे, अंकुश उकिरडे, सिद्धार्थ शिंदे, सोमनाथ बोराडे, रमेश निघुते, अनिल गाडेकर यांसह प्रत्येक वस्तीवरील स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिववहातूक शाखेचा शुभारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

मला राजकारण कळत नाही, असा काहींचा समज असेल तर त्यांनी तो मनातून काढून टाकावा. दिवाळीनंतर राजकारणाचे डावपेच कसे खेळायचे असतात, हे दाखवून देऊ. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे व माजी उपमुख्य मंत्री स्व. अजित पवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली आहे. त्यामुळे मला राजकारण शिकवण्याच्या फंदात कोणीही पडू नका. दिवाळीनंतर डावपेच काय आहे हे मी तुम्हाला दाखवून देईल असा घनाघात आ. अमोल खताळ यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांचे नाव न घेता केला

संगमनेर शहरातील अकोले नाका परिसरात शिवसेनेच्या शिव वाहतूक सेनेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, विभागप्रमुख बाळासाहेब जगदाळे, आरपीआयचे शहरप्रमुख कैलास कासार, उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शाखाप्रमुख भैया रंगरेज, उपशाखाप्रमुख सागर अभंग, सचिव , प्रकाश खंडागळे, कार्याध्यक्ष नितीन पानसरे यांच्यासह शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, संगमनेर नगरपालिका निवडणुकीत यश मिळाले म्हणून विरोधकांनी हुरळून जाऊ नये. तुमचे नगरसेवक टक्केवारी वसूल करण्याचे काम करतात; मात्र आमचे कार्यकर्ते नगरसेवक नसले तरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरून जनसेवक म्हणून काम करत आहे शहरातील सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि व्यावसायिकांना कोणी धमकावण्याचा प्रयत्न करत असेल, तर ते अजिबात खपवून घेतले जाणार नाही. तुमच्या नातेवाईकांचे दवाखाने सुरू राहावे, म्हणून तुम्ही नगरपालिकेचे कॉटेज रुग्णालय बंद पाडले आहे त्यामुळे आपण घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयामध्ये १०० खाटांचे केवळ महिला व लहान मुलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. लवकरच आरोग्यमंत्री संगमनेरमध्ये येऊन येथील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने पावले उचलणार असल्याचे आमदार खताळ पाटील यांनी सांगितले

वृद्धांसोबत आनंदाची दिवाळी

पुरोहित व हरिहर प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दिवाळीचा सण हा आनंद, उजेड, आपुलकीचा उत्सव. याच पवित्र पर्वावर 'पुरोहित प्रतिष्ठान' आणि 'हरिहर प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने एका आगळ्यावेगळ्या वातावरणात वृद्धांसोबत दिवाळीची संध्याकाळ अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.



अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर जवळील केळुंगण येथील कै. नानासाहेब विठ्ठल देशमूख वृद्धाश्रम' येथे हा हृद्य सोहळा पार पडला. निसर्गाच्या कुशीत वसलेले हे ठिकाण अत्यंत सुंदर असून येथील परिसर अतिशय उत्तमरीत्या जपला गेला आहे. या आश्रमात सुमारे ४० ते ४५ आजी-आजोबा राहतात, ज्यांची येथे अत्यंत काळजीपूर्वक जोपासना केली जाते.

या विशेष प्रसंगी वृद्धांसोबत उत्साहात लक्ष्मीपूजन करण्यात आले. सर्वांनी एकत्र येऊन मनोभावे पूजा केली, ज्यामुळे संपूर्ण वातावरणात एक वेगळीच पवित्र ऊर्जा निर्माण झाली. याशिवाय, आश्रमाच्या प्रांगणात सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या, आकर्षक आकाशकंदील, पणत्या लावून वातावरण उजळून निघाले. सर्व ज्येष्ठांना प्रेमाने दिवाळीचा फराळ व दिवाळी निमित्त काही वस्तू देण्यात आल्या. आजी-आजोबांसोबत घालवलेला हा वेळ अत्यंत आनंददायी ठरला. त्यातील काही ज्येष्ठांनी अत्यंत सुरेल आवाजात गाणी गाऊन उपस्थितांची मने जिंकली, तर काहींनी आपले अनुभव आमच्याशी मोकळ्या मनाने व्यक्त केले. या भेटीने त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद झळकला, तो अमूल्य होता. त्यांच्याशी गप्पा मारताना वेळ कसा निघून गेला हे समजलेच नाही. निरोप घेताना, आम्ही लवकरच पुन्हा येऊन त्यांच्यासोबत संपूर्ण दिवस घालवू, असा शब्द त्यांना दिला. त्यांचे ते समाधानी चेहरे पाहून आमची ही दिवाळी खऱ्या अर्थाने सार्थकी लागली.

शेतकऱ्यांच्या मागण्यांवर कारखाना संचालक मंडळांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा - पालकमंत्री

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर-जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांबाबत बैठक घेऊन येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी तातडीने करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी अथवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित राहतील. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामातील ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व मागण्या जाणून घेतल्या.

ऊस दर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.



ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कारखान्यांतील वजनकाट्यांच्या अचूकतेबाबत उपस्थित करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी यांच्या संयुक्त पथकामार्फत सर्व संबंधित कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींही पथकासोबत उपस्थित राहतील. त्यामुळे वजन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गळीत हंगामादरम्यान येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राधान्याने हाताळून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यात समन्वय राखून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने मार्ग काढण्यात येईल, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमहापौर धनंजय जाधव, प्रादेशिक उपसंचालक(साखर) संजय गोंदे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लक्ष्मीपूजन : समृद्धीचा उत्सव आणि श्रमाचा सन्मान!

दिवाळी म्हटली की मनात आनंद, उत्साह, मांगल्य आणि प्रकाशाची एक सुंदर अनुभूती निर्माण होते. दिवाळीच्या या मंगलमय पर्वातील सर्वांत महत्त्वाचा आणि श्रद्धेचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. आश्विन अमावस्येच्या दिवशी सायंकाळी घरोघरी लक्ष्मीपूजन केले जाते. घरातील धन, धान्य, संपत्ती, व्यवसायातील भरभराट आणि कुटुंबाच्या सुखसमृद्धीसाठी देवी लक्ष्मीची आराधना केली जाते. मात्र, लक्ष्मीपूजन हा केवळ धनाची पूजा करण्याचा धार्मिक विधी नसून तो कष्ट, प्रामाणिकपणा, नियोजन, समाधान आणि समृद्ध जीवनमूल्यांचा संदेश देणारा उत्सव आहे.

भारतीय संस्कृतीत लक्ष्मीला धन, वैभव, ऐश्वर्य आणि समृद्धीची देवता मानले जाते. लक्ष्मीचे आगमन व्हावे, घरात सुखशांती नांदावी आणि वर्षभर आर्थिक भरभराट व्हावी, अशी प्रत्येक कुटुंबाची भावना असते. त्यामुळे दिवाळीच्या अमावस्येला घराची स्वच्छता केली जाते. घरासमोर सुंदर रांगोळ्या काढल्या जातात, दारात आकाशकंदील लावले जातात, पणत्यांच्या प्रकाशाने परिसर उजळून निघतो. व्यापारी वर्गासाठी तर हा दिवस विशेष महत्त्वाचा असतो. दुकाने, कार्यालये, कारखाने आणि व्यापाराच्या ठिकाणी लक्ष्मीपूजन करून नवीन आर्थिक वर्षाच्या कामकाजाला शुभारंभ केला जातो. व्यापारी आपल्या हिशेबाच्या वह्या, तिजोरी, यंत्रसामग्री आणि व्यवसायाशी संबंधित साधनांची पूजा करतात. यातून आपल्या उपजीविकेच्या साधनांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची भारतीय परंपरा दिसून येते.



मात्र, लक्ष्मीपूजनाचा खरा अर्थ केवळ पैसा मिळविणे किंवा संपत्तीची वाढ होणे एवढाच मर्यादित नाही. संपत्तीबरोबर सद्बुद्धी, समाधान, आरोग्य, संस्कार आणि माणुसकी यांची जोड नसेल, तर त्या संपत्तीला खऱ्या अर्थाने समृद्धी म्हणता येणार नाही. पैसा माणसाला सुविधा देऊ शकतो; पण समाधान, प्रेम आणि मानसिक शांतता देण्यासाठी चांगले विचार आणि सुदृढ नातेसंबंध आवश्यक असतात. म्हणूनच लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने धनासोबत विवेकाचीही पूजा झाली पाहिजे.

आजच्या काळात अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. उद्योग, व्यापार, शेती, सेवा क्षेत्र आणि तंत्रज्ञान यांमुळे रोजगाराच्या आणि आर्थिक प्रगतीच्या अनेक संधी निर्माण होत आहेत. मात्र, महागाई, बेरोजगारी, वाढता आर्थिक ताण आणि कर्जबाजारीपणा यांसारखी आव्हानेही सामान्य माणसासमोर उभी आहेत. अशा परिस्थितीत लक्ष्मीपूजनाचा दिवस आर्थिक शिस्त आणि योग्य नियोजनाचा संकल्प करण्यासाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. उत्पन्न आणि खर्च यांचा समतोल राखणे, अनावश्यक खर्च टाळणे, बचतीची सवय लावणे, योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे आणि कर्जाचे नियोजन करणे हीदेखील आधुनिक काळातील लक्ष्मीचीच आराधना आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या कष्टातूनच खऱ्या अर्थाने समृद्धी निर्माण होते. शेतकरी शेतात घाम गाळतो, कामगार कारखान्यात श्रम करतो, व्यापारी जोखीम स्वीकारतो, उद्योजक रोजगारनिर्मिती करतो, तर कर्मचारी आणि अधिकारी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतात. या सर्वांच्या श्रमातून देशाची अर्थव्यवस्था उभी राहते. त्यामुळे लक्ष्मीपूजन करताना केवळ संपत्तीचा गौरव न करता ती निर्माण करणाऱ्या श्रमाचा सन्मान करणेही तितकेच आवश्यक आहे. आपल्या व्यवसायात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा, कामगारांचा आणि सहकाऱ्यांचा सन्मान करणे, त्यांच्या कुटुंबांच्या आनंदात सहभागी होणे, हीच समृद्धीची खरी सामाजिक जाणीव आहे.

लक्ष्मीपूजनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक बांधिलकी. समाजात आजही अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. काहींच्या घरात दिवाळीच्या पणत्या पेटतात, तर काहींच्या घरात दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असते. अशा वेळी आपल्या आनंदात गरजूंचाही सहभाग करून घेणे, एखाद्या गरीब कुटुंबाला मदत करणे, कामगारांना सन्मानाने दिवाळी भेट देणे किंवा गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, हीच लक्ष्मीपूजनाच्या भावनेची खरी पूर्तता ठरते. कारण संपत्तीचा उपयोग केवळ स्वतःच्या सुखासाठी न होता समाजाच्या कल्याणासाठीही झाला पाहिजे.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही दिवाळी साजरी करताना जबाबदारीची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. प्रकाशाचा हा उत्सव प्रदूषणाचा उत्सव बनू नये. फटाक्यांचा अतिवापर टाळून पारंपरिक पणत्या, मातीचे दिवे आणि पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य दिले पाहिजे. स्थानिक कुंभार, कारागीर आणि छोट्या व्यावसायिकांकडून वस्तू खरेदी केल्यास त्यांच्या कष्टांना आर्थिक आधार मिळू शकतो. आपल्या सणाचा आनंद दुसऱ्याच्या रोजगाराचे साधन बनला, तर त्या आनंदाला अधिक व्यापक अर्थ प्राप्त होतो.

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येकाला अधिक पैसा, मोठे घर, महागडी वाहने आणि उच्च जीवनशैली हवी आहे. या अपेक्षा चुकीच्या नाहीत; परंतु त्या पूर्ण करताना प्रामाणिकपणा, नैतिकता आणि माणुसकी हरवता कामा नये. अन्याय, फसवणूक, भ्रष्टाचार किंवा दुसऱ्याचे नुकसान करून मिळविलेल्या संपत्तीला समृद्धीचे स्वरूप देता येत नाही. कष्टाने मिळविलेला पैसा, प्रामाणिक व्यवहार आणि समाधानाने जगण्याची वृत्ती यांमध्येच खऱ्या लक्ष्मीचे वास्तव्य असते. लक्ष्मीपूजनाचा हा मंगल दिवस प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याचा, नव्या संकल्पांचा आणि सकारात्मक विचारांचा दिवस बनवावा. आपल्या कुटुंबाच्या प्रगतीसोबत समाजाच्या विकासाचाही विचार करावा. घरात संपत्ती येण्याबरोबरच मनात चांगले विचार, नात्यांमध्ये प्रेम आणि व्यवहारात प्रामाणिकपणा वाढला पाहिजे. कारण केवळ धनवान होणे म्हणजे समृद्ध होणे नव्हे; तर समाधानी, सुसंस्कृत आणि दुसऱ्याच्या सुखदुःखात सहभागी होणारा माणूस बनणे हीच खरी श्रीमंती आहे.

'युवावार्ता' दिवाळी अंक

ज्ञान, विचार आणि मनोरंजनाचा समृद्ध दीपोत्सव



दिवाळी म्हटलं की फराळाच्या मेजवानीबरोबर दिवाळी अंकांच्या वाचनाची बौद्धिक मेजवानीही आलीच! मराठी साहित्यसंस्कृतीची ही समृद्ध परंपरा संगमनेरसारख्या छोट्या शहरातून सातत्याने जपण्याचे उल्लेखनीय कार्य 'युवावार्ता' परिवार १९ वर्षे अविरत करीत आहे. संस्थापक-संपादक किसनभाऊ हासे यांच्या परिश्रमातून साकारलेला 'युवावार्ता दिवाळी अंक २०२६' आशय, विषयवैविध्य आणि मांडणीच्या दृष्टीने विशेष सरस ठरला आहे.

अंकात साहित्य, इतिहास, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. 'बंडखोरीचे अढळ आशास्थान'मधून आशा भोसले यांच्या कलाप्रवासाचा वेध घेतला आहे. 'यशवंतराव ते देवेंद्र' महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीचे विश्लेषण करतो. 'नाना : पडद्यावर वादळ आणि मातीशी नातं' कलावंताच्या सामाजिक जाणिवा उलगडतो. 'भारत आणि धर्म' धार्मिक परंपरांचा ऐतिहासिक मागोवा घेतो. 'आर्थिक साक्षरता' आर्थिक नियोजनाचे महत्त्व पटवून देतो; तर '-ख आणि पुढील पिढीसमोरील आव्हाने' बदलत्या तंत्रयुगातील प्रश्नांना भिडतो.

शिवकालातील अपरिचित संगमनेर हा डॉ. संतोष खेडलेकर यांचा लेख अनेक ऐतिहासिक संदर्भांचा उलगडा करतो.'नसती आफत'सारखे विनोदी लेख, काव्य दलनातील अनेक अर्थगर्भ कविता आणि अरविंद गाडेकर यांची व्यंगचित्रे अंकातील गांभीर्याला प्रसन्न विरंगुळ्याची जोड देतात. विषयानुरूप चित्रसजावट, सुबक मांडणी आणि अभ्यासपूर्ण लेखन ही अंकाची बलस्थाने आहेत. माझ्या लेखनप्रवासातही 'युवावार्ता'चे योगदान मोलाचे राहिले आहे. नवोदित लेखकांना व्यासपीठ देण्याची त्यांची भूमिका विशेष अभिनंदनीय आहे. ग्रामीण भागातून प्रकाशित होऊनही आशयाच्या बाबतीत व्यापक वैचारिक क्षितिज गाठणारा हा अंक म्हणजे ज्ञान, प्रबोधन आणि मनोरंजनाचा सुंदर दीपोत्सवच! या सुंदर साहित्यिक मेजवानी बद्दल किसन भाऊ हासे, संपादकीय टिम आणि युवावार्ता परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन!

अशोक शेटे
मो. ९९२११६९२८६

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दुग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आमच्या असंख्य ग्राहक, हितचिंतकांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक -
दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

सहकारामुळे संगमनेरची बाजारपेठ फुलली



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठी व समृद्ध बाजारपेठ असलेल्या संगमनेरच्या बाजारपेठेत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखालील अमृत उद्योग समूह व तालुक्यातील संलग्न सहकारी संस्थांच्या माध्यमातून सुमारे १६० कोटींच्या पुढे रक्कम बाजारात आल्याने शहरातील बाजारपेठ पुन्हा एकदा जोरदार फुलली असून बाजारपेठ व व्यापारी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संगमनेर शहर हे जिल्हा व राज्यातील सुसंस्कृत शांत व सुरक्षित आणि विकासातून पुढे असलेले शहर आहे. गतिमान नेतृत्व,सक्षम सहकार, शैक्षणिक व सामाजिक सलोखा यामुळे संगमनेर शहर हे देश पातळीवर विकासाचे मॉडेल ठरले आहे. मात्र मागील दोन वर्षापासून संगमनेर मध्ये मोठे अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. अस्थिरता व अस्वस्थता यामुळे संगमनेरची बाजारपेठ थोडीशी ठप्प झाली होती.

संगमनेरच्या बाजारपेठेवर बाहेरील तालुक्यांचाही मोठा विश्वास मात्र संगमनेर बटबटीत वाटणारी फ्लेक्सबाजी आणि अस्थिर वातावरण, सध्या वाढलेली दडपशाही यामुळे बाहेरच्या नागरिकांचा संगमनेरकडे येण्याचा कल कमी झाला होता. यामुळे शहरातील व्यापारावर याचा मोठा परिणाम झाला. याची जाणीव शहरातील व्यापारी मंडळीला झाली त्यामुळे त्यांच्या चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

दीपावली निमित्ताने काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृत उद्योग समूहातील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे २२ कोटी, राजहंस दूध संघाचे ५० कोटी, दूध संघास संलग्न असलेल्या गावांमधील दूध सोसायट्यांमधून सुमारे ५५ कोटी, अमृतवाहिनी कॉलेज, अमृतवाहिनी बँक ,शेतकी संघ, सह्याद्री, राजहंस कंपनी, यांसह तालुक्यातील विविध संलग्न सहकारी संस्था,तालुक्यातील विविध सेवा सोसायटी, दूध संस्था, शैक्षणिक संस्था, बँका,पतसंस्था मिळून सुमारे १६० कोटी रुपये बाजारात आले आहे.

शेतकऱ्यांना चांगले लाभांश, उसाचे अनुदान, कामगारांना बोनस, दूध रेबिटचे वाटप करण्यात आले आहे. या संस्था सह तालुक्यातील विविध संस्थांमुळे संगमनेरच्या बाजारपेठात मोठी गर्दी दिसत आहे. शहरात मेन रोड, नवीन नगर रोड, बाजारपेठ, नाशिक रोड यामध्ये कपडे, सोने, विविध गृह उपयोगी वस्तू,मिठाई, फटाके, रोषणाईचे दिवे, खरेदी करण्यासाठी नागरिक व महिलांची मोठी गर्दी आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर व तालुका हा प्रामाणिक तालुका म्हणून ओळखला जात असून त्यामुळे संगमनेरसह आजूबाजूच्या तालुक्यातूनही नागरिक विश्वासाचे ठिकाण म्हणून संगमनेर शहरात खरेदी करण्यासाठी येतात. यावर्षी कमी पावसामुळे दुष्काळाचे सावट आहे. शहरात विविध दुकानांसमोर प्रदर्शनीय वस्तू सह शोभेच्या वस्तू लावण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातूनही नागरिक महिला व लहान मुले मोठ्या संख्येने खरेदीसाठी येत असून सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.

याउलट राज्यात काही ठिकाणी व्यापारी वर्ग अहवाल दिल असताना संगमनेर मध्ये मात्र दुकानदार आपल्या दुकानांच्या गर्दीमुळे शटर बंद करत आहेत. खरेदीसाठी नंबर लावावे लागत आहेत. सर्वत्र उत्साह, आनंद चैतन्य असल्याने संगमनेर तालुक्याची दिवाळी आनंदात आहे. विविध रस्ते रस्त्यांवर बाल गोपाळ व चिमुकल्यांची धांदल,माहेरवासिनी सासरवासीची लगबग या आनंदमय वातावरणामुळे सर्वत्र उत्साह दिसून येत आहे.

ज्येष्ठांचा आधारवड ठरलेल्या हेमंत पोटे यांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचे काम ईगल फाउंडेशन सातत्याने करत असून, हे कार्य इतरांसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर यांनी केले.

सिंहगड कॉलेज, कोर्टी (पंढरपूर) येथे आयोजित ईगल फाउंडेशनच्या राष्ट्रीय गरुड झेप २०२६ गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्ते हेमंत पोटे यांना त्यांच्या उल्लेखनीय समाजकार्याबद्दल महादेव जानकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय 'गरुड झेप' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हेमंत पोटे यांनी गेल्या पाच वर्षांपासून सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते निःस्वार्थपणे काम करतात. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आणि इंदिरा गांधी योजनांसाठी आवश्यक अर्ज भरणे, कागदपत्रांची पूर्तता करणे आणि शासकीय कार्यालयातील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ते लाभार्थ्यांना मदत करतात.

विशेष म्हणजे, संगमनेरमधील अडीच हजारांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. दिव्यांग आणि कर्करोगासारख्या दुर्धर आजारांच्या रुग्णांना ते स्वखर्चाने मोफत सेवा देतात. त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांसाठी ते आधारवड ठरले आहेत. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर यांनीही निःस्वार्थपणे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव होणे ही निकोप समाजाची ओळख असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास ईगल फाउंडेशनचे अध्यक्ष विलासराव कोळेकर, उपाध्यक्ष सागर पाटील, सचिव शेखर सूर्यवंशी, राज्य संपर्कप्रमुख बाबासाहेब राशिनकर, प्रमुख संघटक शिरीष कुलकर्णी, प्रकाश बंजोळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

'गोकुळ'मध्ये मागच्या दाराने महायुती सत्तेत येणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

गेल्या काही दिवसांपासून गल्लीपासून दिल्लीपर्यंत चर्चेत असलेल्या गोकुळ अर्थातच कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघावर महायुतीच्या सत्तेचा सोपान (मार्ग) सुकर झाला आहे. 'गोकुळ' दूध संघाच्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्यानंतर राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारने नवीन मार्ग शोधला आहे. जिल्हा मध्यवर्ती बँका वगळून ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये ५ सदस्य शासनामार्फत नियुक्त करण्याचा अध्यादेश जारी केला आहे. या अध्यादेशावर अखेर जिष्णुदेव वर्मा यांनी शुक्रवारी स्वाक्षरी केली.

या शासननियुक्त ४ सदस्यांना मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आल्यामुळे महायुतीचे बळ आता १२ वरून थेट १६ वर पोहोचले आहे. परिणामी, गोकुळवर महायुतीची, म्हणजेच विशेषतः अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांची सत्ता येणे अत्यंत सोपे झाले आहे.नुकत्याच पार पडलेल्या गोकुळच्या निवडणुकीत काँग्रेस आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वातील गटाने २५ पैकी १३ जागांवर विजय मिळवला होता, तर हसन मुश्रीफ यांच्या गटाने १२ जागा जिंकल्या होत्या. संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडीसाठी १४ सदस्यांच्या बहुमताची गरज आहे. हे बहुमत गाठण्यासाठी महायुती सरकारने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला. मंत्रिमंडळाने या निर्णयाला मंजुरी दिल्यानंतर आता अध्यादेश जारी करण्यात आला असून राजपत्रातील अधिसूचनेनंतर या नवीन तरतुदी अंमलात येतील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अ-मधील पोट कलम-२ मध्ये नवीन मजकूर जोडला जात आहे. ज्या संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे आणि ज्यांना भागभांडवल, कर्ज, हमी, अनुदान किंवा सरकारी जमीन या स्वरूपात शासनाची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत मिळते, अशा संस्थांमध्ये शासनाला सदस्य नेमण्याचा अधिकार असेल. जिल्हा मध्यवर्ती बँका वगळता इतर सर्व संघीय संस्थांच्या संचालक मंडळात शासनातर्फे ५ सदस्यांचा समावेश केला जाईल.

भीमाशंकर सह्याद्रीतील कुऱ्हाडबंदी विरोधात आदिवासींचा एल्गार

समाजसेवक अनंत घाणे यांचा आमरण उपोषणाला पाठिंबा


छाया– विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भीमाशंकर अभयारण्य व सह्याद्री पर्वतरांगांतील आदिवासी बांधवांच्या पारंपरिक हक्कांवर गदा आणणाऱ्या 'कुऱ्हाडबंदी' विरोधात सुरू असलेल्या आमरण उपोषणाला समाजसेवक अनंत घाणे, तुकाराम खाडे, रामदास पिचड, सचिन भवारी यांच्यासह अकोले तालुक्यातील आदिवासी बांधवांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

प्रांताधिकारी, तहसीलदार, वन्यजीव व सामाजिक वनीकरण अधिकाऱ्यांसमोर झालेल्या बैठकीत आंदोलकांनी कुऱ्हाडबंदीचा निर्णय रद्द करणे, इको सेन्सिटिव्ह झोनबाबत स्थानिकांना विश्वासात घेणे, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि लघुवनोपजाला हमीभाव देण्याची ठाम मागणी केली. केवळ आश्वासने न देता जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः उपोषणस्थळी येऊन सर्व मागण्या लेखी स्वरूपात मान्य कराव्यात, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. जंगलाचे संरक्षण करा, पण आदिवासींचे पारंपरिक हक्क हिरावून घेऊ नका, असा इशारा देत जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत माघार घेतली जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

अमृतवाहिनी विद्यापीठाची भविष्यवेधी शैक्षणिक वाटचाल !

पुढील वर्षी बायोइंजिनिअरिंग, एआय, सायबर सिक्युरिटी व रोबोटिक्सचे अभ्यासक्रम सुरू होणार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शिक्षण, संशोधन, नवतंत्रज्ञान आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम बनविण्याच्या उद्देशाने लोकनेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणमंत्री ना. बाळासाहेब थोरात साहेब यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या अमृतवाहिनी विद्यापीठाने आपल्या भविष्यवेधी शैक्षणिक वाटचालीतील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. विद्यापीठात बी.टेक. आणि एम. टेक. कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी या दोन नवीन अभ्यासक्रमांचा उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांसाठी कॉस्मेटिक क्षेत्रातील उच्च शिक्षण, संशोधन, रोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त व सचिव सौ. शरयू देशमुख, विश्वस्त श्री. अनिल शिंदे, डमिनिस्ट्रेशन हेड डॉ. एस. के. निंबाळकर, विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. आर. बी. सातपुते, रिसर्च हेड डॉ. जे. बी. गुरव, स्कूल ऑफ लाईफ सायन्सेसचे डीन डॉ. एम. जे. चव्हाण तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ वाढवून व फीत कापून करण्यात आले. यानिमित्ताने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच नियमित शैक्षणिक कार्यास प्रारंभ झाला.

यावेळी स्कूल ऑफ लाईफ सायन्सेसचे डीन डॉ. एम. जे. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाचे स्वरूप, त्यातील शैक्षणिक संधी आणि भविष्यातील करिअरच्या विविध पर्यायांची माहिती दिली. डमिनिस्ट्रेशन हेड डॉ. एस. के. निंबाळकर यांनी १९७८ पासून सुरू झालेल्या अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत संस्थेने केलेली प्रगती आणि अमृतवाहिनी विद्यापीठाच्या स्थापनेमागील संकल्पना व प्रवास त्यांनी विशद केला.

रजिस्ट्रार डॉ. आर. बी. सातपुते यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सध्याच्या काळात सौंदर्यप्रसाधनांच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून कॉस्मेटिक इंडस्ट्री ही वेगाने विकसित होणारी उद्योगशाखा आहे. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना कॉस्मेटिक उत्पादनांची निर्मिती, संशोधन व विकास, गुणवत्ता नियंत्रण, औद्योगिक उत्पादन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी उपलब्ध होतील. आगामी काळातही विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्तारासाठी आधुनिक व उद्योगाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त व सचिव सौ. शरयू देशमुख यांनी पालकांनी अमृतवाहिनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अमृतवाहिनी विद्यापीठाच्या स्थापनेमागील संकल्पनेपासून ते प्रत्यक्ष साकार झालेल्या स्वप्नापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास त्यांनी उलगडून सांगितला. एखादे शैक्षणिक स्वप्न केवळ संकल्पनेपुरते मर्यादित न ठेवता दूरदृष्टी, सातत्यपूर्ण प्रयत्न, योग्य नियोजन, सामूहिक योगदान आणि जिद्दीच्या बळावर ते वास्तवात उतरविता येते, याचे अमृतवाहिनी विद्यापीठ हे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.गेल्या पाच दशकांपासून अमृतवाहिनी संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे विश्वासार्ह केंद्र म्हणून ओळखली जात आहे. संस्थेचे विद्यार्थी शिक्षण, उद्योग, कॉर्पोरेट क्षेत्र, संशोधन, प्रशासन, व्यवसाय आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. या समृद्ध शैक्षणिक वारशाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते विविध शैक्षणिक उपक्रमांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत डॉ. एस. के. निंबाळकर, डॉ. आर. बी. सातपुते, सरस्वती टीम तसेच डॉ. रोहित डुबे-पाटील यांचे विशेष योगदान असल्याचेही त्यांनी नमूद केले.तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील विशेष परीश्रम घेतल्याचे सांगितले.

पुढील शैक्षणिक वर्षापासून बायोइंजिनिअरिंग हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन असून, स्कूल ऑफ इंजिनिअरिंगअंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग (-ख चड), सायबर सिक्युरिटी, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग यांसारखे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच स्कूल ऑफ बायोफ्युएल इंजिनिअरिंगअंतर्गतही नवीन शैक्षणिक संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रयत्नशील आहे. बदलत्या औद्योगिक आणि जागतिक रोजगार बाजारपेठेच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान, प्रत्यक्ष प्रशिक्षण, संशोधन आणि कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विद्यापीठाचा विशेष भर राहणार आहे.

अमृतवाहिनी विद्यापीठाचा उद्देश केवळ पदवी प्रदान करणे नसून ज्ञान, कौशल्य, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या माध्यमातून सक्षम, आत्मनिर्भर व जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणारी युवा पिढी घडविणे हा आहे. शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे तसेच स्वयंरोजगार व संशोधनासाठी प्रोत्साहन देणे हे विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या यशस्वी शैक्षणिक उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, माजी शिक्षणमंत्री व अमृतवाहिनी विद्यापीठाचे कुलपती ना. बाळासाहेब थोरात साहेब, संस्थेचे विश्वस्त मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, श्री. अनिल शिंदे आणि कार्यकारी विश्वस्त व सचिव सौ. शरयू देशमुख यांनी सर्व संबंधित अधिकारी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच नवीन अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक व व्यावसायिक भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. महेश खताळ यांनी.

संपादकीय...

फटाक्यांचा धूर नको, माणुसकीचा प्रकाश हवा!

दिवाळी हा केवळ दिव्यांचा, फराळाचा आणि आनंदोत्सवाचा सण नाही, तर अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आशेचा आणि वाईटावर चांगुलपणाचा विजय साजरा करणारा उत्सव आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणात प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण असते. अंगणात रांगोळ्या सजतात, दारात आकाशकंदील झळकतात, पणत्या उजळतात आणि नात्यांमधील आपुलकी अधिक घट्ट होते. मात्र, अलीकडच्या काळात दिवाळीच्या आनंदाला फटाक्यांच्या वाढत्या धुराचे आणि कर्णकर्कश आवाजाचे गालबोट लागत आहे. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत फटाक्यांच्या धुराऐवजी दिव्यांचा प्रकाश पसरवण्याचा संकल्प प्रत्येकाने करण्याची गरज आहे. दिवाळी म्हटली की फटाके, आतषबाजी आणि रोषणाई यांचे आकर्षण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच असते. परंतु या आनंदाच्या क्षणांची किंमत पर्यावरणाला आणि आरोग्याला मोजावी लागत असेल, तर त्या आनंदाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. फटाके फोडल्यानंतर हवेत मोठ्या प्रमाणात धूर, धूलिकण आणि हानिकारक वायू मिसळतात. यामुळे हवेची गुणवत्ता खालावते. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, श्वसनाचे विकार असलेले रुग्ण आणि पाळीव प्राणी यांना त्याचा अधिक त्रास सहन करावा लागतो. रात्री उशिरापर्यंत होणाऱ्या आतषबाजीमुळे ध्वनिप्रदूषणही वाढते. सण साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र दुसऱ्याच्या आरोग्याला आणि शांततेला बाधा पोहोचवण्याचा अधिकार कोणालाही नाही. आज वातावरणातील प्रदूषण हा केवळ चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर तो मानवी अस्तित्वासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे. शहरांमध्ये वाढणारी वाहनांची संख्या, औद्योगिक प्रदूषण, वृक्षतोड आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरणाचा समतोल आधीच बिघडत आहे. अशा परिस्थितीत सणांच्या निमित्ताने प्रदूषणात आणखी भर घालणे योग्य ठरणार नाही. दिवाळीच्या काही दिवसांत फटाक्यांवर होणारा खर्च जर गरजूंच्या मदतीसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यांसाठी किंवा पर्यावरण संवर्धनासाठी वापरला, तर त्या आनंदाला खऱ्या अर्थाने सामाजिक मूल्य प्राप्त होईल. दिवाळीचा प्रकाश केवळ घराच्या उंबरठ्यापुरता मर्यादित राहू नये. समाजातील अंधार दूर करण्यासाठीही या प्रकाशाचा उपयोग झाला पाहिजे. एखाद्या गरीब कुटुंबाला फराळ देणे, गरजू मुलांना कपडे आणि शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत वेळ घालवणे, अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे, हीसुद्धा दिवाळी साजरी करण्याची सुंदर पद्धत आहे. आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्यातच सणाचे खरे सार्थक आहे. विशेषतः पालकांनी मुलांना दिवाळीचा खरा अर्थ समजावून सांगण्याची गरज आहे. फटाके फोडणे म्हणजेच दिवाळी साजरी करणे नव्हे, तर घरातील ज्येष्ठांचा आशीर्वाद घेणे, निसर्गाची काळजी घेणे, गरजूंना मदतीचा हात देणे आणि समाजात प्रेम, बंधुभाव निर्माण करणे म्हणजे दिवाळी, हे संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचले पाहिजेत. शाळा, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि स्थानिक प्रशासन यांनीही पर्यावरणपूरक दिवाळीसाठी जनजागृती करावी. आज गरज आहे ती केवळ दिवे लावण्याची नाही, तर विचारांमध्येही प्रकाश निर्माण करण्याची. मातीच्या पणत्या लावून स्थानिक कुंभारांना रोजगार मिळवून देणे, स्वदेशी वस्तूंचा वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वृक्षारोपणासारखे उपक्रम राबवणे, अशा छोट्या कृतींतून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

श्री श्री रविशंकर विद्या मंदिरच्या मुलांची जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत अजिंक्यपदावर मोहोर



सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर स्कूल आणि श्री श्री रविशंकर क्रिकेट अकादमी, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. १४ वर्षांखालील मुलांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत शाळेच्या संघाने विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे, सलग चौथ्या वर्षी या स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवत संघाने विजयाची ऐतिहासिक चौकार नोंदवला आहे. या सातत्यपूर्ण यशामुळे शाळेने जिल्हास्तरीय क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

'खेळातून घडते व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तिमत्त्वातून घडतो यशाचा मार्ग!' या विचाराला अनुसरून श्री श्री रविशंकर क्रिकेट अकादमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. अकादमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ क्रिकेटचे तांत्रिक प्रशिक्षणच दिले जात नाही, तर त्यांच्यामध्ये शिस्त, जिद्द, आत्मविश्वास, संघभावना आणि खिलाडूवृत्ती यांसारखे गुणही विकसित केले जातात. नियमित सराव, नियोजनबद्ध प्रशिक्षण आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यांमुळे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता, मानसिक खंबीरता आणि खेळातील कौशल्ये अधिक विकसित होत आहेत. याच प्रशिक्षणाचे आणि खेळाडूंच्या कठोर परिश्रमांचे फलित म्हणजे सलग चौथ्या वर्षी मिळवलेले हे जिल्हास्तरीय विजेतेपद होय.

स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी उत्कृष्ट तंदुरुस्ती, प्रभावी रणनीती, शिस्तबद्ध खेळ आणि सांघिक एकजूट यांचे दर्शन घडवले. प्रतिस्पर्धी संघांचे आव्हान समर्थपणे पेलत खेळाडूंनी शेवटपर्यंत विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांच्या जिद्दीला, मेहनतीला आणि आत्मविश्वासाला यशाची साथ मिळाली. सलग चार वर्षे विजेतेपद मिळवण्याची ही कामगिरी म्हणजे खेळाडूंच्या गुणवत्तेची आणि शाळेच्या सातत्यपूर्ण क्रीडा संस्कृतीची पावती आहे.

प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनातून यशाची चौकार! या दैदीप्यमान यशामागे क्रीडा प्रशिक्षक योगेश खरात, अदीप वाघ, प्रथमेश हासे यांचे मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम लाभले आहेत. खेळाडूंच्या तांत्रिक कौशल्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यापासून ते त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि संघभावना रुजविण्यापर्यंत प्रशिक्षकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांचा सुंदर संगम या विजयातून दिसून येतो. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून विजयी संघाचे कौतुक! या ऐतिहासिक यशाबद्दल सुमेरू एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापिका श्रीमती स्वाती शाह, सेक्रेटरी श्री. समीर शाह, प्राचार्या श्रीमती आरती सप्रा, उपप्राचार्या श्रीमती ज्योतिर्मया चव्हाण तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे आणि मार्गदर्शक प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण आणि योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या शाळेच्या प्रयत्नांचे सर्वांनी कौतुक केले. भविष्यातही हे खेळाडू राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाचा ठसा उमटवतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सलग चार वर्षांचे विजेतेपद हे केवळ एका संघाचे यश नसून, श्री श्री रविशंकर विद्या मंदिरच्या जिद्द, मेहनत, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण क्रीडा प्रशिक्षणातून निर्माण झालेल्या विजयाच्या परंपरेचे प्रतीक आहे!

ताम्हाबाई वाकचौरे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कळस येथील जुन्या पिढीतील व्यक्तिमत्व ताम्हाबाई लक्ष्मण वाकचौरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या कळस येथील चहा वाली बाई म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले माजी सैनिक यादव वाकचौरे, संपत वाकचौरे, शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हा प्रमुख रावसाहेब वाकचौरे दोन मुली सुगंधा कर्पे, बबाई सरोदे , नातू हॉटेल व्यावसायिक संतोष वाकचौरे, तुषार वाकचौरे, परिवहन महामंडळ चे चालक किरण वाकचौरे, सागर वाकचौरे, अगस्ती साखर कारखान्याचे कर्मचारी प्रसाद वाकचौरे, लक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन प्रवीर मालुंजकर यांची मावशी होती. कळस येथील स्मशानभूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

रिक्त पदे भरणे आहे

MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner

- बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
- कार्यालयीन प्रशासक – १
- आयटी प्रोफेशनल – १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह

Contract - mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

पाहिजेत

गरजू व अनुभवी साईट इंजिनीअर, सुपरवायझर व ऑफिस असीस्टंट पाहिजेत

- संपर्क -

चिंतामणी डेव्हलपर्स

7741057560

पाहिजेत

श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट, माळीवाडा, ता. संगमनेर

संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.

संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी

9850387044
9623469373

राजुर प्रकल्प अंतर्गत ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह' साजरा होणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर-क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंती निमित्त आणि 'जनजातीय गौरव दिवस' औचिती साधून अहिल्यानगर जिल्ह्यात ११ नोव्हेंबर २०२६ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. प्रकल्प कार्यालय राजूर (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) अंतर्गत या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, आदिवासी विकास विभागाच्या वतीने श्रीमती देवकन्या बोकडे (प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ११ व १२ नोव्हेंबर २०२६: जिल्हा मुख्यालय व सर्व अनुसूचित जमाती बहुल तालुका मुख्यालय स्तरावर पत्रकार परिषदांचे आयोजन.

१३ नोव्हेंबर २०२६ (लाभार्थी लाभावाटप व अर्थसंकल्प दिन): धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान अंतर्गत लाभवाटप, तसेच महिला बचत गट व कृषी क्षेत्राशी संबंधित योजनांचे धनादेश वितरण. १४ नोव्हेंबर २०२६ (स्वच्छता आणि दीपोत्सव): आदिवासी स्मारके व सार्वजनिक ठिकाणच्या पुतळ्यांची स्वच्छता, दीपोत्सव, तसेच आदिवासी संस्कृती व परंपरांचे दर्शन घडवणारे कार्यक्रम. १५ नोव्हेंबर २०२६ (भगवान बिरसा मुंडा जयंती - मुख्य सोहळा): अहिल्यानगर जिल्ह्यासह सर्व आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये भगवान बिरसा मुंडा व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, पद्म पुरस्काराने सन्मानित व्यक्ती, आदिवासी समाजातील प्रतिभावंत, संत-महंतांचा सन्मान आणि गडचिरोली येथे राज्यस्तरीय मुख्य सोहळा पार पडणार. १६ नोव्हेंबर २०२६ (आधार कार्ड व शासकीय सेवा शिबीर): आधार कार्ड दुरुस्ती, वनपट्टेधारकांना लाभ, पीकविमा व शेतकरी नोंदणी संदर्भातील ऑनलाईन सेवांचे मार्गदर्शन.

१७ नोव्हेंबर २०२६ (आरोग्य व पोषण जनजागृती शिबीर): मोफत आरोग्य तपासणी, माता व बाल आरोग्य मार्गदर्शन, तसेच पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व सांगणारे शिबीर. १८ नोव्हेंबर २०२६ (समारोप व मार्गदर्शन): आदिवासी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सबलीकरण दिवसानिमित्त महिला बचत गट, कौशल्य विकास, बँक व वित्त साक्षरता, स्पर्धा परीक्षा आणि शिक्षणविषयक मार्गदर्शन शिबीर व सप्ताहाचा समारोप.

सर्व आदिवासी बांधवांनी व नागरिकांनी या सेवा सप्ताहातील विविध उपक्रमांचा आणि शासकीय योजनांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

|| जनसेवा हिच ईश्वर सेवा ||

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

दूरध्वनी (०२४२५) २२५३०८, २२५१६५, फॅक्स –२२५९६३

E-mail - cosangamner@gmail.com

जा. क्र. सं. न.प. विद्युत/२०२६/१०६ दिनांक – ०५/११/२०२६

जाहीर ई–निविदा सुचना २०२६

संगमनेर नगरपरिषद संगमनेर , मध्ये खालील काम करणे करिता शासनाच्या योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदाराकडून ई–निविदा पद्धतीने मागविण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फी	कामाची मुदत
१	संगमनेर नगरपरिषद विद्युत विभागाकरिती कुशल मनुष्यबळ पुरवठा करणे	१०,०००/–	१०००/–	१२ महिने

१) ई-निविदा फॉर्म दि. ०६/११/२०२६ पासून दि. १२/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत नगरपरिषद कार्यालय विद्युत विभाग येथे उपलब्ध राहील.
२) ई-निविदा दि. १२/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत निविदा स्वीकारण्यात येतील. निविदा ह्या ई-निविदा पद्धतीने स्वीकारण्यात येतील.
३) तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये पात्रतेची कागदपत्रे नोंदणी प्रमाणपत्र, जी. एस.टी. प्रमाणपत्र, इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रति ऑनलाईन सादर करावे. लिफाफा क्र. २ मध्ये वित्तीय लिफाफा असेल.
४) एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार संगमनेर नगरपरिषद मा. मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

Dr. R. S. Gunjal Welfare Foundation

R. S. Gunjal College of B. Sc. Nursing

Gunjalwadi Pathar, Chandanapuri Ghat, Sangamner, Dist.-Ahilyanagar -422620.
Email- dr.rsgunjalbscnursing@gmail.com, Website :www.drrsgibscnursing.org
Mobile no. – 9209873430 , 8468816440.

ADMISSION FOR VACANT SEATS

Academic Year- 2026-2027(College Code – 9420)

CET Cell Notice No:MED-1026/C.R.No.07/New Registration/CAP3 & Inst. Level Round/2604,Date: 02/11/2026

Applications are invited from eligible candidates for the admissions for vacant seats after CAP round for B.Sc. Nursing for academic year 2026-27. The eligible & desirous candidates must apply in person/any person to the College from- 08/11/2026 to 10/11/2026 upto 05.30 pm

The details of institute level admission schedule & seat matrix is available on State CET Cell website. Cut Off date of admission is 15th Nov. 2026





कामगार भरती

अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक

सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक

वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर

9028342110
9262625962

पाहिजेत

राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

पुरूष – ४ जागा
महिला – २ जागा

रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर

8669184141

फ्लॅट विकणे आहे!

फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.

- संपर्क -

8379064040

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर

पाहिजेत

एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे

सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य

ऑफिस असिस्टंट -१
कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक

कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य

अर्जासह समक्ष भेटावे

संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत

ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे

आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर

9922113534
9730468090

पाहिजेत

ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे

श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर

- संपर्क -

8308015324

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अंजनी
होम अप्लायन्सेस सर्व्हिस
प्रो.प्रा दिपक दुस्सा
Mo. 9970256292
7588540906
तत्काळ दुरुस्ती सेवा | चांगल्या प्रतिची हमी | योग्य दरात सेवा | घरी येऊन दुरुस्ती
आमच्या कडे सर्व प्रकारच्या घरगुती वापरातील वस्तु मिक्सर, फॅन,गॅस,गिझर,गॅस शेगडी,भट्टी इतर वस्तु विक्री व दुरुस्ती करुन मिळेल.
अकोलकर कॉम्प्लेक्स, दिवेकर गॅस समोर मालदाड रोड, संगमनेर

संगमनेरमध्ये 'हॉटेल साईकृपा' आणि 'कोकोपाम ॲक्वा लाऊंज'चा भव्य शुभारंभ

१९७१ पासूनची चव आणि सेवेला नवे रूप; मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा



उद्घाटन स्थळ : हॉटेल साईकृपा प्युअर व्हेज अँड कोकोपाम क्वा लाऊंज, आडवा ओढा, रायतेवाडी फाटा, भारत पेट्रोल पंपाच्या शेजारी, रायतेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

उद्घाटन : मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ सायंकाळी ४ वाजता.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - खवय्यांच्या मनावर गेल्या अनेक दशकांपासून अधिराज्य गाजवणारी १९७१ पासूनची चव आणि दर्जेदार सेवेसाठी प्रसिद्ध असलेली 'हॉटेल साईकृपा' आता संगमनेरमध्ये नव्या रूपात, नव्या ठिकाणी आणि नव्या सुविधांसह ग्राहकांच्या सेवेत दाखल होत आहे. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर रायतेवाडी फाटा येथे 'हॉटेल साईकृपा (प्युअर व्हेज)' आणि 'कोकोपाम क्वा लाऊंज' या नव्या शाखेचा भव्य शुभारंभ मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

हॉटेल साईकृपाच्या या नव्या शाखेमुळे संगमनेरच्या हॉटेल व्यवसायात एक आकर्षक आणि दर्जेदार पर्व सुरू होणार आहे. पारंपरिक चव, उत्कृष्ट आतिथ्य आणि आधुनिक सुविधांचा संगम या नव्या प्रकल्पात अनुभवायला मिळणार आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच 'कोकोपाम क्वा लाऊंज' हे विशेष आकर्षण ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आधुनिक सुविधा आणि खवय्यांसाठी खास पर्वणी -

रायतेवाडी फाटा, आढवा ओढा, भारत पेट्रोल पंपाच्या शेजारी उभारण्यात आलेल्या या भव्य वास्तूमध्ये प्युअर व्हेज रेस्टॉरंट, सुसज्ज बँक्वेट हॉल आणि आकर्षक क्वा लाऊंज अशा विविध सुविधा उपलब्ध असणार आहेत. कुटुंबीयांसोबत भोजनाचा आनंद घेण्यासाठी तसेच विवाह सोहळे, वाढदिवस, कौटुंबिक समारंभ आणि विविध कार्यक्रमांसाठी हे ठिकाण विशेष आकर्षण ठरणार आहे.

'१९७१ पासून तिच चव, तिच सेवा आता नव्या रूपात खास आपल्यासाठी!' या संकल्पनेतून साईकृपा परिवाराने ग्राहकांशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला आहे. जुन्या चवीचा विश्वास आणि आधुनिक सुविधांची जोड यामुळे संगमनेरकरांसह परिसरातील नागरिकांना एक नवा अनुभव मिळणार आहे.

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

या भव्य उद्घाटन सोहळ्यास माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी कृषिमंत्री आमदार माणिकराव कोकाटे, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे, संगमनेरचे आमदार अमोल खताळ, विधानपरिषद सदस्य सत्यजित तांबे, जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे, अकोलेचे माजी आमदार वैभवराव पिचड, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक रणजितसिंह देशमुख, मालपाणी उद्योग समूहाचे राजेश मालपाणी, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संगमनेरच्या नगराध्यक्षा मैथिलीताई तांबे, युवानेते उदयभाऊ सांगळे तसेच मालपाणी उद्योग समूहाचे गिरीषभाऊ मालपाणी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

साईकृपा परिवाराचा विस्तार

हॉटेल साईकृपा परिवाराने आपल्या दर्जेदार सेवा आणि चविष्ट खाद्यपदार्थांच्या माध्यमातून विविध ठिकाणी आपली ओळख निर्माण केली आहे. कसारा गाव (शहापूर) येथील 'साईनाथ बार अँड रेस्टॉरंट', कसारा बायपास, कसारा घाट येथील 'हॉटेल साईकृपा' आणि 'हॉटेल न्यू साईकृपा' या शाखांनंतर आता संगमनेरमध्ये 'साईकृपा प्युअर व्हेज अँड कोकोपाम क्वा लाऊंज' ही नवी शाखा सुरू होत आहे.

या नव्या शाखेच्या उद्घाटन सोहळ्यास ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक आणि संगमनेरकर नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन मालती बाळकृष्ण पा. शिंदे, राजेंद्र बाळकृष्ण पा. शिंदे, विजय बाळकृष्ण पा. शिंदे, प्रकाश बाळकृष्ण पा. शिंदे, राकेश राजेंद्र पा. शिंदे, कल्पेश राजेंद्र पा. शिंदे, विपुल विजय पा. शिंदे, प्रफुल्ल विजय पा. शिंदे आणि चि. अथर्व प्रकाश पा. शिंदे यांनी केले आहे.

शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज



युवावार्ता (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) राष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील 'ब्रीच कँडी' रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. श्वसन आणि छातीत संसर्ग झाल्यामुळे दोन दिवसांपूर्वी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता त्यांची प्रकृती स्थिर असून, डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे.

वाढते वय आणि सततच्या दौऱ्यांमुळे शरद पवार यांना श्वसनाचा आणि छातीत संसर्गाचा त्रास जाणवू लागला होता. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना दोन दिवसांपूर्वी तातडीने ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारांना त्यांनी चांगला प्रतिसाद दिल्यानंतर आणि प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे.शरद पवार रुग्णालयात दाखल असताना राज्याच्या राजकारणात मात्र मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करून शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनीही रुग्णालयात जाऊन पवारांची भेट घेतली होती. या भेटीगाठींमुळे राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात होते.

घुलेवाडीत चोरट्यांचा धुमाकूळ!

बंद घर फोडून दोन लाखांचा ऐवज लंपास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरालगतच्या घुलेवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोड्यांचा धुमाकूळ घातला असून, बंद घरांना लक्ष्य करून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. खिडक्यांचे लोखंडी गज कापून घरात प्रवेश करत चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घुलेवाडी येथील अमृतनगर परिसरात राहणारे अविनाश साहेबराव आव्हाड (वय ३९) यांच्या घरातही चोरट्यांनी चोरी केली. आव्हाड हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयात कार्यरत आहेत. चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाट आणि साहित्याची उचकापाचक करून मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला.

या चोरीत एक तोळ्याची सोन्याची अंगठी, एक तोळ्याचा सोन्याचा हार, चार ग्रॅम वजनाचे ओम पान आणि सहा ग्रॅम वजनाचे कानातील डूल, असे अंदाजे एक लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. याशिवाय घरातील ४० हजार रुपयांची रोख रक्कमही चोरट्यांनी लंपास केली. त्यामुळे या घरफोडीत दागिने आणि रोकड मिळून सुमारे एक लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. घुलेवाडी परिसरात घडलेल्या अन्य घरफोड्यांच्या घटनांचाही तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. विशेष म्हणजे, घराच्या खिडकीचे लोखंडी गज कापून चोरट्यांनी आत प्रवेश केल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयितांचा माग काढणे आणि चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे आवश्यक आहे. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. घुलेवाडी परिसरात घडलेल्या अन्य घरफोड्यांच्या घटनांचाही तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

विशेष म्हणजे, घराच्या खिडकीचे लोखंडी गज कापून चोरट्यांनी आत प्रवेश केल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयितांचा माग काढणे आणि चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे आवश्यक आहे.

१४ हजारांहून अधिक आरोग्य कर्मचाऱ्यांना अखेर न्याय

आमदार खताळ यांच्या अधिवेशनातील मागणीला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गेल्या १० ते १५ वर्षांपासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आरोग्यसेवेचे कर्तव्य बजावणाऱ्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागणीला अखेर यश आले आहे. या कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आमदार अमोल खताळ यांनी २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधत ठामपणे आवाज उठविला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, शासनाने १४ हजार ७८७ पात्र कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वार्षिक ९८३ कोटी ८० लाख रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सेवेत कार्यरत असलेल्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाबद्दल संगमनेर तालुक्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांनी आमदार खताळ यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्यसेवेचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. विशेषतः कोरोना महामारीच्या अत्यंत कठीण काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या कर्मचाऱ्यांनी रुग्णांची सेवा केली. संकटाच्या काळात आरोग्य यंत्रणेचा महत्त्वाचा आधार बनून त्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले. मात्र, एवढी वर्षे सेवा करूनही त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नव्हते. या कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भविष्याचा विचार करून त्यांना न्याय मिळावा, यासाठी पावसाळी अधिवेशनात शासनाकडे आग्रही मागणी केली होती. १४ हजार ७८७ कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा निर्णय हा त्यांच्या अनेक वर्षांच्या कष्टांचा आणि सेवाभावाचा सन्मान आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार असून, त्यांच्या कामालाही योग्य प्रतिष्ठा मिळेल.

आरोग्य कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी यापुढेही आपण ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणार असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही आमदार खताळ यांनी दिली.

बाळासाहेब थोरात यांनी घेतली शरद पवारांची रुग्णालयात भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: देशाच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते तथा खासदार शरदचंद्रजी पवार हे सध्या मुंबई येथील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईक विचारपूस करण्यासाठी महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा काँग्रेस राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांनी आज रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी थोरात यांनी पवार साहेबांच्या तब्येतीची सविस्तर चौकशी करत त्यांना लवकरात लवकर उत्तम आरोग्य लाभावे आणि ते पुन्हा पूर्ण क्षमतेने जनसेवेच्या कार्यात रुजू व्हावेत, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

मागील दोन दिवसांपासून खासदार शरदचंद्रजी पवार हे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची माहिती समजल्यानंतर राज्यभरातील विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली असून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आहे. पवार साहेबांच्या प्रकृतीबाबत महाराष्ट्रातील जनतेमध्येही काळजी आणि आपुलकीची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, बाळासाहेब थोरात यांनी काल नाशिक येथे उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बैठकीत सहभाग घेतला. ही बैठक पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबईकडे प्रयाण केले. आज दुपारी त्यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात जाऊन शरदचंद्रजी पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पवार साहेबांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची आपुलकीने विचारपूस केली. तसेच त्यांच्या लवकर प्रकृतीसुधारणेसाठी शुभेच्छा दिल्या.

शरदचंद्रजी पवार हे देशाच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनातील ज्येष्ठ नेतृत्व असून महाराष्ट्राच्या विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. विशेषतः शेती, सहकार, ग्रामीण विकास आणि शेतकरी हिताच्या प्रश्नांशी त्यांचा दीर्घकाळ संबंध राहिला आहे. त्यामुळे पवार साहेबांनी लवकरात लवकर पूर्णपणे बरे होऊन पुन्हा एकदा जनतेच्या सेवेसाठी सक्रिय व्हावे, अशी भावना बाळासाहेब थोरात यांनी यावेळी व्यक्त केली.

दिवाळीच्या शुभपर्वाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकरी बांधवांसह सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी पवार साहेबांचे मार्गदर्शन आणि अनुभव यापुढेही लाभत राहावेत, अशी अपेक्षाही थोरात यांनी व्यक्त केली. पवार साहेबांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांची प्रकृती लवकर सुधारावी, यासाठी त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या.

या भेटीप्रसंगी राज्यभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह मुंबई काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

संभाजी जोंधळे यांच्या पुढाकारातून वसतिगृहात दिवाळीचा आनंदोत्सव



युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित नवभारत कन्या वसतिगृह, सारोळे पठार येथे दीपावलीनिमित्त विद्यार्थिनींना फराळाचे, तर त्यांच्या मातांना साड्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम संभाजी जोंधळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे संभाजी जोंधळे, विद्यालयाचे प्राचार्य उत्तम खांडवी व वसतिगृह अधीक्षिका सुनीता नवथर यांच्या हस्ते फराळ व साडी वाटप करण्यात आले.

यावेळी संभाजी जोंधळे यांनी विद्यार्थिनींना दीपावली सणाचे महत्त्व सांगितले. अंधारावर प्रकाशाचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय दर्शविणारा हा सण आनंद, समृद्धी व संस्कारांचा संदेश देतो, असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी भाऊराव धोंगडे, रघुनाथ मेंगाळ, संतोष भांगरे, संजय ठोकळ, चेतन सरोदे, विठ्ठल फटांगरे, मंगेश औटी, श्रीकृष्ण वर्पे, नारायण डोंगरे तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थिनी व त्यांच्या मातांना दिवाळीच्या निमित्ताने आनंदाची भेट मिळाल्याने कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण झाले.

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !

कॅमल®
सुपरफाईन शाबुदाणा

उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच

1 kg | 500gm | 250gm

सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा

9601222777
9615222777

काजळे ज्वेलर्स

सोने
चांदी
हिरे
नवरत्न


बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७२। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | रविवार ०८/११/२०२६ | पान - ६

आमच्या सर्व ग्राहक, जाहिरातदार हितचिंतकांना दिवाळीच्या शुभेच्छा

फराळ, फटाके जिकडे तिकडे. दिवाळी म्हणजे राजेन्द्रचे कपडे

दिवाळी आली, चला 'राजेन्द्र'मध्ये!
खास दिवाळीसाठी असंख्य व्हरायटीज.



१९५९ पासून राजेन्द्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
क्लॉथ स्टोअर्स

मेन रोड, संगमनेर.
फोन : 02425-225740, 79010 31155

मुळचंद

आता आपल्या संगमनेरमध्ये

होलसेल मिल डेपो

डायरेक्ट मिल ते ग्राहक



लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच

मो. 7498901766

हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

दिपावली धमाका ऑफर

दागिन्यांच्या मजुरीवर

25% सूट

ऑफर कालावधी : 5 ते 30 नोव्हेंबर 2026

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्स

मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर ☎ ०२४२५ - २२३८६२ ७५८८२ ४९८४९



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

SMBT BANK

* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग

डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग

हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब

जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा

संपर्क क्रमांक - 8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६



डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist



डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार)

डॉ. नितीन जठार
एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी.
कन्सल्टंट फिजिशियन
तज्ज्ञ : छातीचे हृदय रोग
टी.बी. व दम्याचे विकार

डॉ.सौ. उज्ज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच.
कन्सल्टंट पेडियाट्रिशियन
तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इमर्जन्सी अर ची केअर



अत्याधुनिक कॅथलॅब (Cath Lab)



शुभ दिपावली
दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दुर्गेश टेक्सटाईल मार्केट

सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी

आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..

संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



सणासुदीत
सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!

दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50% पर्यंत सूट

११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६

कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.



सर्वात कमी भाव

ओम मयूर® ज्वेलर्स
OM MAYUR JEWELLERS
आपुलकीने वावे विश्वासाने घ्यावे

सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044



दिवाळी पाडवा निमित्त
सोने खरेदीची उत्तम संधी
आता मजुरी फक्त
4% पासुन सुरुवात

सर्व दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित

मे. पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

• अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
• माफक दरात - संगमनेर येथेच
• 105 बेड्स
• तज्ञ डॉक्टर्स
• अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532
आजच संपर्क करा

24/7 Emergency Services